**वस्तू व सेवाकर विभाग, विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय,**
**तिसरा मजला, नवीन इमारत, माझगाव, मुंबई.**

**सेवानिवृत्त राज्यकर सहायक आयुक्त गट-अ व समकक्ष गट-अ अधिकारी (वेतनस्तर एस-२५ पेक्षा कमी) यांची करारपद्धतीने नियुक्ती.**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दिनांकः १० जून, २०२५ मधील तरतुदीनुसार या विभागातील आस्थापना विषयक विवक्षित कामाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त राज्यकर सहायक आयुक्त (गट-अ) व समकक्ष गट-अ अधिकारी (वेतनस्तर एस-२५ पेक्षा कमी) यांच्याकडून विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगाव, मुंबई येथे आस्थापनेवरील कार्यालयांकरिता एकूण ०१ सेवानिवृत्त गट-अ अधिकारी (वेतनस्तर एस-२५ पेक्षा कमी) यांना सेवा करार पद्धतीने घेण्याकरिता अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने या कार्यालयास ६ अर्ज प्राप्त झाले. सदर अर्जांची छाननी समितीने छाननी केली असता तीन उमेदवारांकडे सबंधित पदाची पात्रता नसल्याने त्यांचे अर्ज अपात्र केले व उर्वरीत तीन उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले. उर्वरित तीन उमेदवारांची मुलाखत दि.१८.०२.२०२६ रोजी दुपारी ठिक ३ वाजता मा. विशेष राज्यकर आयुक्त यांचे परिषद कक्ष (Conference Hall), वस्तू व सेवाकर भवन,एफ विंग, तिसरा मजला, नविन इमारत, माझगांव, मुंबई येथे आयोजीत करण्यात आली. सदर मुलाखतीच्या अनुषंगाने मुलाखत समितीचे अभिप्राय प्राप्त झाले. सदर अभिप्रायांनुसार, श्री. संतोष महादेव कडवे यांना सेवा करार पध्दतीने नियुक्तीकरीता पात्र ठरविण्यात आले आहे.

सही /-
विशेष राज्यकर आयुक्त,
वस्तू व सेवाकर विभाग,माझगाव, मुंबई.

Scanned with OKEN Scanner